## नॉन-इंटेंसिव्ह(Non-Intensive) जिल्हयांमध्ये महाराष्ट्र 'राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना'च्या अंमलबजावणीबाबत प्रारुप (Draft) मार्गदर्शक सूचना

**पार्श्वभूमी :-**

ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुंटंबासाठी अनेक केंद्रपुरस्कृत कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने 1978 या वर्षी **'एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम' (आयआरडीपी)** सुरू करण्यात आलेला होता. या कार्यक्रमामध्ये कालांतराने ग्रामीण क्षेत्रातील **ड्वाक्रा, सिट्रा, ट्रायसेम तसेच गंगा कल्याण योजना** यांसारख्या काही उपक्रमांचा समावेश करण्यात आला. याचाच पुढील सुधारीत टप्पा म्हणून केंद्र शासनाने दारिद्र्य निर्मूलनासाठी एप्रिल 1999 मध्ये **'स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना' (एसजीएसवाय)** हा पतकर्ज व अर्थसहाय्यावर आधारीत कार्यक्रम सुरू केलेला होता. तथापि या योजनेतील काही ठळक उणीवा केंद्र शासनाच्या निर्दशनास आल्या होत्या.

सर्व गरीब व गरीबांतील गरीबांना या योजनांमध्ये सहभागी करून घेण्यात येऊ शकलेले नाही. गरीबांच्या गटांची नोंदणी मोठ्या प्रमाणात झाली, मात्र गटांची बांधणी आवश्यक त्या प्रमाणात झालेली नाही. सुरू झालेले अनेक बचत गट कालांतराने बंद पडण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. गटांचे श्रेणीकरण पुरेशा प्रमाणात झालेले नाही. सक्षम संस्थात्मक व्यवस्था, पायाभूत सुविधा व योग्य प्रशिक्षकांचा अभाव योजनेत दिसून येतो. गटांचे संघीकरण करण्याबाबत निश्चित धोरणाच्या अभावामूळे संघीकरण अत्यंत कमी प्रमाणात झाले आहे. त्याच प्रमाणे स्वरोजगारींचे आरोग्य, सामाजिक सुरक्षा (Social Security), विमा व तत्सम पर्यायांबाबत कोणताही समर्पक विचार करण्यात आलेला नाही. बँकांची गटांसंदर्भातील भूमिका देखील 'उद्दिष्टपूर्तीचे एक साधन' यापेक्षा वेगळी दिसून आली नाही. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे स्वतंत्र व व्यावसायिक मनुष्यबळ नाही, तसेच ग्रामपंचायत आणि गट स्तरावरही अशा स्वतंत्र यंत्रणेचा अभाव आहे.

या सर्व बाबी लक्षात घेऊन केंद्र व राज्य राज्य शासनामार्फत 'राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान' (NRLM) नावाने नवीन अभियान सन 2011 पासून सुरू करण्यात आलेले आहे.

**अभियानाचे गृहीतक:-** गरीबांची दारिद्र्यातून बाहेर येण्याची प्रबळ इच्छा शक्ती व अंगभूत क्षमता आहे. ही अंगभूत क्षमता जागृत करण्यासाठी राज्यस्तरापासून ग्रामस्तरापर्यंत समर्पित(Dedicated) व संवेदनशील (Sensitive) आधारभूत संरचना उभी करण्याची गरज आहे.

**अभियानाची उदि्दष्टये:-** दारिद्र्य निर्मुलनासाठी सर्व गरीबांपर्यंत पोहचून, त्यांच्या संस्था स्थापन करणे व त्यांच्या सदस्यांची व संस्थांची भक्कम उभारणी करणे आणि त्याद्वारे गरीबांना शाश्वत स्वयंरोजगार व वेतनी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना दारिद्र्य रेषेच्या बाहेर येऊन आपले जीवनमान उंचावण्यासाठी सक्षम बनविणे.

**अभियानाचे महत्तवाचे घटक :-**

**1) संवेदनशील सहाय्य संरचना:-** राज्य, जिल्हा, तालुका व क्लस्टर(मंडळ/केंद्र) पातळीवर समर्पित (Dedicated) व संवेदनशील (Sensitive) कर्मचारी वृंदांचा समावेश असलेली संरचना, जी शक्यतो कायम स्वरूपी न घेता प्रतिनियुक्तीवर किंवा करार पध्दतीने घेण्यात येईल.

**2) सर्वसमावेशक सामाजिक सहभाग:-** दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक कुटुंबातील किमान एक सदस्य (शक्यतो महिला) स्वयंसहाय्यता गटामध्ये सहभागी होऊन या अभियानाच्या मदतीने कुटुंबाला दारिद्र्य रेषेच्या बाहेर आणण्यासाठी सक्षम होणार आहे.

**3) दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारींच्या संस्थांचे उन्नतीकरण:-** दारिद्र्य निर्मूलनासाठी गरीबांच्या संस्था, जसे स्वयंसहाय्यता गट आणि त्यांचे जिल्हास्तरापासून ते ग्रामस्तारापर्यंत चे संघ यांचे बळकटीकरण करून त्यांना (गरीबांना) त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सर्वतोपरी मदत करण्यास सक्षम बनविणे.

4) **मागणी आधारीत योजना:-** ‘मागणी आधारीत योजना’ हे या अभियानाचे ठळक वैशिष्ट्ये आहे. गरीबांच्या गरजांच्या पुर्ततेसाठी गरीबांच्या स्वयंप्ररणेतून राज्य ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत संघटन, व्यवस्थापन व अंमलबजावणी प्रणाली विकसित करण्यात येईल.

5) **प्रशिक्षण व क्षमता बळकटीकरण:-** या योजनेत स्वरोजगारींना व त्यांच्या संस्थांना व्यवस्थापकीय व कौशल्यविषयक प्रशिक्षण देण्यात येईल.

6) **फिरता निधी व भांडवली अनुदान:-** स्वयंसहाय्यता गटांना त्यांच्या बचतीशिवाय खेळता निधी व पतपुरवठा केला जातो. तसेच तात्काळ गरजा भागविण्यासाठी फिरता निधी दिला जातो. गटांना ज्या-ज्या वेळी गरज पडेल; त्या-त्या वेळी आर्थीक गरज भागविण्यासाठी कर्ज दिले जाईल. ज्यावेळी स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्याची गरज पडेल, त्यावेळी भांडवली अनुदान व पतपुरवठा केला जाईल.

7) **सर्वसमावेशक आर्थिक अंतर्भाव:-** गरीबांना बँकिंग सुविधा केवळ बँक खाते उघडण्यापुरती मर्यादीत न ठेवता त्यापलिकडे जाऊन **वैश्विक आर्थिक अंतर्भाव** साध्य करण्यात येईल. तसेच गरीबांना जीवनरक्षा, आरोग्य आणि साधनसंपत्ती यासाठी विमा संरक्षण पुरविण्यात येईल.

8) **व्याज दरासाठी अनुदान:-** गरीबांना शाश्वत उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध होण्यासाठी वारंवार कर्ज घ्यावे लागते, असे कर्ज परवडावे म्हणून व्याज अनुदानाची तरतूद करण्यात आलेली आहे.

9) **मुलभूत सुविधा निर्मिती व विपणन सहाय्य:-** गरीबांना जीवनोन्न्ती उपक्रमासाठी मुलभूत सुविधा निर्मिती व विपणन सहाय्य दिले जाईल; ज्यामध्ये बाजार संशोधन, पणन मार्गदर्शन व अनुषांगिक सेवा उपलब्ध करून दिल्या जातील.

10) **अन्य योजनांशी समन्वय:-** शासनाच्या विविध विभागांतर्गत सुरू असलेल्या योजनांशी (जसे एमजीनरेगा, वसुंधरा, डेअरी इत्यादी) या अभियानाशी सांगड घालण्यात येईल.

11**) कौशल्यवृध्दी तसेच नोकरी देणारे प्रशिक्षणाचे विशेष प्रकल्प:-** बाजारात मागणी असलेल्या बाबींवर तरूणांना प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरी मिळवून देण्यासाठी विशेष प्रकल्पांवर खर्च केला जाईल.

12) **भागीदारी:-** या अभियानात विविध संस्था व व्यक्ती यांच्याबरोबर भागीदारी करण्यात येईल.

13) **पंचायत राज संस्थांशी समन्वय:-** जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांशी परस्पर सहकार्यासाठी समन्वय ठेवला जाईल.

14) **नावीन्यपुर्णता (Innovation):-** दारिद्र्य निर्मूलनासाठी यशस्वी कार्यपध्दती विकसित करणे ही सर्वाधिक महत्त्वाची बाब आहे, त्यासाठी नावीन्यपूर्ण पध्दती विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

15) **सनियंत्रण:-** अभियानाच्या सनियंत्रणासाठी MIS, नियमित बैठका, क्षेत्रीय भेटी आणि सामाजिक लेखा परीक्षण या साधनांचा वापर केला जाईल.

**मार्गदर्शक सूचना :-**

केंद्र शासनाने 'राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान' (NRLM) सन 2011 पासून सुरू केल्यांतर राज्यांनी या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र राज्यस्तरापासून ग्रामस्तरापर्यंत समर्पित व संवेदनशील आधारभूत संरचना उभी करावयाची आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याने 'संस्था नोंदणी अधिनियम 1860' नुसार **'महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान' (MSRLM)** या नावाने सोसायटी ची स्थापना केलेली आहे.

दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या संस्थांचे संघटन आणि विकसन ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे. राज्याचा विस्तार पाहता शासनाने हे अभियान **इंटेंसिव्ह(Intensive)** आणि **नॉन-इंटेंसिव्ह(Non-Intensive)** अशा दोन टप्प्यांमध्ये राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वसाधारणपणे बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये हे अभियान **इंटेंसिव्ह स्वरुपात टप्प्याटप्प्याने** राबविण्यात येणार आहे. इंटेंसिव्ह(**Intensive**) जिल्हयांमध्ये ठाणे, रत्नागिरी, नंदूरबार, जालना, सोलापूर, उस्मानाबाद, वर्धा, यवतमाळ, गडचिरोली आणि गोंदिया या दहा जिल्हयांतील 36 तालुक्यांमध्ये **जागतिक बँकेच्या मदतीने 'राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती प्रकल्पाच्या' (NRLP)** 'इंटेंसिव्ह पध्दतीने' अंमलबजावणी सुरू झाली आहे.

राज्यातील (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर वगळून) उर्वरित जिल्हयांमध्ये व तालुक्यांमध्ये **'नॉन-इंटेंसिव्ह'** स्वरूपात अंमलबजावणी करण्याच्या हेतूने मार्गदर्शक सूचना प्रसिध्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**अभियानाची अंमलबजावणी यंत्रणा:-**

जिल्हास्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA) ही अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम करील.त्यासाठी खालील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

1) सर्व सहा.प्रकल्प अधिकारी व विस्तार अधिकारी(उद्योग व एसजीएसवाय) यांच्या रिक्त जागा तात्काळ भरण्यात याव्यात.

2) प्रत्येक तालुक्यात (Intensive तालुके वगळून) दोन तालुका समन्वयकांच्या करार पध्दतीने नेमणूका कराव्यात, विस्तार अधिकारी(उद्योग व एसजीएसवाय) आणि तालुका समन्वयक यांचे वेतन, भत्ते व मानधन MSRLM च्या जिल्हास्तरावरील उपलब्ध निधीमधून 'क्षमता बांधणी' अंतर्गत आदा करण्यात यावे.

(तालुका समन्वयकांच्या करार पध्दतीने नेमणूका करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.)

नॉन-इंन्टेसिव्ह जिल्ह्यात अभियानाची अंमलबजावणी करताना केंद्र शासनाच्या सूचनांच्या अनुषंगाने खालील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**खर्चाचा तपशिल आणि मर्यादा:-** नॉन-इंन्टेसिव्ह जिल्ह्यात अभियानाची अंमलबजावणी करताना फिरता निधी, भांडवली अनुदान, व्याज अनुदान, क्षमता बांधणी, पायाभूत सुविधा आणि प्रशासकिय खर्चाच्या बाबींमध्ये केलेल्या सुधारणा पुढीलप्रमाणे आहेत.

अ) खर्चाच्या बाबींचा तपशिल:-

| **अ.क्र.** | **खर्चाच्या बाबीं** | **एनआरएलएम** |
|---|---|---|
| 1 | भांडवली अर्थ अनुदान / व्याज अनुदान | 25% |
| 2 | फिरता निधी | 20% |
| 3 | संस्था बांधणी / क्षमता बांधणी | 30% |
| 4 | पायाभूत सुविधा व विपणन | 20% |
| 5 | प्रशासकिय खर्च | 5% |

वरील प्रमाणे भांडवली अनुदान / व्याज अनुदान यांवरील खर्चात कपात करून त्या ऐवजी फिरता निधी, संस्था बांधणी व क्षमता बांधणी यांवर अधिक भर दिलेला आहे. स्वयंसहाय्यता गटांची व त्यांच्या संस्थांची भक्कम क्षमता बांधणी केल्यानंतर त्यांच्यामधून तयार होणा-या उत्कृष्ट **'समुदाय संसाधन व्यक्ती'(Community Ressource Person-CRP)** व **उत्कृष्ट 'लेखापाल'(Book Keeper -BKs)** यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर लोक चळवळ उभी राहण्यास मदत होईल.

तसेच प्रशासकिय खर्चासाठी देखील प्रथमच 5 टक्के खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे.

ब) अनुदानाच्या बाबींचा तपशिल:-

| अ.क्र. | अनुदानाच्या बाबी | किमान मर्यादा | कमाल मर्यादा | ठळक बाबी |
|---|---|---|---|---|
| 1 | फिरता निधी | रु. 10 हजार | रु.15 हजार | पंचसूत्रीच्या आधारे प्रथम श्रेणीकरणानंतर पात्र गटांना देय. |
| 2 | भांडवली अनुदान<br>प्रती स्वरोजगारी | रु.15 हजार (सर्वसाधारण) | रु. 20 हजार (अनु.जाती/जमाती) | अनु.जाती/जमाती 50%, अल्पसंख्यांक-15%, अपंग-3% या प्रमाणात देय. |
| | स्वयंसहाय्यता गट | किमान मर्यादा नाही. | रु 2.50 लक्ष | किमान दुसरी श्रेणी पुर्ण केलेल्या व 70% BPL सदस्यांच्या गटाला नियमित कर्जफेडीच्या प्रमाणात देय. |
| 3 | व्याज अनुदान | ................. | रु.1 लक्ष / प्रती कुटुंब (कर्ज रक्कम) | बँकदर आणि 4% यांमधील तफावती एवढे अनुदान नियमित कर्जफेड करणा-या गटाच्या खाती दर सहामाहीस, अनु.जाती/जमाती 50%, अल्पसंख्यांक-15%, अपंग-3% आणि महिला 50% या प्रमाणात देय. |
| 4 | प्रशिक्षण निधी | ................. | रु.7500 / प्रती स्वरोजगारी | ............................................................... |

या सर्व निधींमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी आपल्या जिल्हयाचा वास्तवदर्शी (**नॉन-इंटेंसिव्ह**) आराखडा तयार करुन जिल्हास्तरीय नियंत्रण समितीच्या मान्यतेने अंमलात आणावा. त्याची प्रत या (MSRLM)कार्यालयास सादर करण्यात यावी.

आराखडा मंजूरीनंतर खालील धोरणांसंदर्भात खर्च करता येईल.

**संस्था बांधणी:-**

सध्या अस्तित्वात असलेल्या स्वयंसहाय्यता गटांच्या बळकटीकरणाचा कार्यक्रम प्राधान्याने हाती घेण्यात यावा, यासाठी गटांची यशस्वी स्वयंसहाय्यता गट, प्रशिक्षित परंतु अकार्यक्षम बनलेले गट आणि बंद पडलेले गट अशी सर्वकष माहिती उपलब्ध करून घ्यावी.

- 'पंचसूत्रीच्या' आधारे सध्या अस्तित्वात असलेल्या स्वयंसहाय्यता गटांचे मुल्यमापन करण्यात यावे. तसेच अस्तित्वात आलेल्या स्वयंसहाय्यता गटांना 'पंचसूत्रीचा' परिचय करून द्यावा.
- पंचसूत्री :-

  1) नियमित बैठका घेणे.
  2) नियमित बचत करणे.
  3) अंतर्गत कर्जाचे वाटप करणे.
  4) नियमित कर्जाची परतफेड करणे.
  5) लेखा पुस्तके अद्ययावत ठेवणे.

  सेवाभावी संस्था / प्रेरक यांच्यामदतीने पुढील उर्वरीत आर्थिक वर्षात अस्तित्वात असलेल्या स्वयंसहाय्यता गटांची पुनर्बांधणी व सक्षमीकरण कार्यक्रम राबविण्यात यावा.

- यशस्वी स्वयंसहाय्यता गटांमधून **'समुदाय संसाधन व्यक्ती'(CRP)** व **'लेखापाल'(BK)** बनण्याची क्षमता असणाऱ्या सदस्यांची निवड करावी व त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. यांचा उपयोग नवीन स्वयंसहाय्यता समुहांच्या उभारणीसाठी करण्यात यावा.
- सद्यस्थितीत नवीन **ग्रामसंघ** स्थापन करण्यात येऊ नयेत.
- शेतकरी संघ, उत्पादक संघ, पाणी वापर संस्था, मजूर संस्था या सारख्या गावपातळीवरील संस्थांची पडताळणी करुन घ्यावी.

**आर्थिक समावेशन धोरण :-**

फिरता निधी, भांडवली अनुदान, व्याज अनुदान या बाबींवर स्वयंसहाय्यता समुहांना त्यांच्या मागणीनुसार आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच सदरची आर्थिक मदत थेट बँकांना न देता गटांना देण्यात यावी. यासाठी गटांनी लेखे अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. आर्थिक अनुदानांच्या बाबतीत खालील सुधारीत मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**फिरता निधी:-**

1) या अभियानांतर्गत जे स्वयंसहाय्यता गट SGSY प्रमाणे फिरता निधी मिळण्यासाठी पात्र आहेत, मात्र ज्यांना अद्याप पर्यंत फिरता निधी मिळालेला नाही, त्यांना किमान रु. 10,000 व कमाल रु. 15,000 एवढा फिरता निधी देण्यात यावा. यामध्ये अनुदान आणि कर्जाचे प्रमाण 1 : 2 असे ठेवण्यात यावे.(उदा. 10,000/- अनुदान + 20,000/- कर्ज असे मिळून 30,000/- देण्यात यावेत.)
2) ज्या स्वयंसहाय्यता गटांनी फिरता निधी व कॅश क्रेडीटची वेळेवर परतफेड केलेली आहे, त्यांना त्यांच्या मागणीनुसार कॅश क्रेडीटची मर्यादा रु. 25,000 वरुन रु. 50,000 पर्यंत वाढविण्यात यावी.
3) ज्या स्वयंसहाय्यता समुहांची कॅश क्रेडिटची रक्कम कोणत्याही कारणाने व्यपगत झाली असेल, किंवा परतफेड झालेली नसेल तर अशा गटांना यशस्वी **'समुदाय संसाधन व्यक्ती' (CRP)** किंवा **अर्धशासकीय संस्था (NGO)/ प्रेरक** यांच्या मार्फत बळकटीकरण करण्यासाठी नियोजन करण्यात यावे.
4) दुर्बल / बंद पडलेल्या गटांची पुनर्बांधणी करण्यात यावी. त्यासाठी समुदायाच्या समरुप-समविचारी व शक्यतो समान गरजा असणाऱ्या महिलांची निवड करण्यात यावी.
5) फिरता निधी देण्यापूर्वी गटाचे पंचसूत्रीच्या आधारे मुल्यमापन करुन प्रथम श्रेणीकरण झालेल्या गटाला फिरता निधी देण्यात यावा. जे गट पंचसूत्रीचा अवलंब करीत नाहीत त्यांची क्षमता बांधणी करण्यात यावी.

**स्वयंसहाय्यता समूहांची बँकाशी संलग्नता:-**

1) बँकांनी पंचसूत्रीच्या आधारावर श्रेणीकरण झालेल्या व फिरत्या निधीची नियमित परतफेड करणाऱ्या स्वयंसहाय्यता समूहांना मोठे कर्ज घेण्यापूर्वी लहान कर्ज उपलब्ध करुन दयावे. त्यामुळे गटाची सक्षमता वाढण्यास मदत होईल.
2) बँकांनी स्वयंसहाय्यता समूहांकडे केवळ उद्दिष्ट पूर्तीचे एक साधन म्हणून न पाहता गटांच्या व गटातील सदस्यांच्या उत्पन्न वाढीसाठी भूमिका बजावावी.
3) अस्तित्वात असलेल्या स्वयंसेवी संस्था / प्रेरक यांना गटांना बँकांच्या संलग्नतेबाबत उद्दिष्टे देण्यात यावे

**भांडवली अनूदान**

1) भांडवली अनूदान हे गटांना तसेच वैयक्तिक स्वरोजगारींना देय राहील. वैयक्तिक स्वरोजगारींना सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु. 15,000 तर अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गासाठी रु. 20,000 प्रमाणे देय राहील. तर गटांना हे अनुदान कमाल रु. 2.50 लक्ष या मर्यादेत असेल. गटांना भांडवली अनूदानासाठी किमान 70 टक्के सदस्य हे दारीद्रय रेषेखालील असणे बंधनकारक आहे. वैयक्तिक स्वरोजगारींना भांडवली अनुदान देताना हे अनुदान अत्यंत अपवादात्मक स्थितीत (ज्या परिस्थितीत गटांची स्थापना करणे शक्य होणार नाही केवळ त्याच परिस्थितीत ) देण्यात यावेत.
2) गटांना भांडवली अनूदानासाठी पात्रतेचे निकष-
   I. गट प्रत्यक्षात अस्तित्वात आल्यापासून किमान 12 महिन्यांचा काळ लोटलेला असावा.
   II. फिरता निधी मिळाल्यापासून किमान 6 महिने झालेले असावेत.
   III. वित्त पुरवठा करणाऱ्या बँकेकडून समाधानकारक अहवाल मिळायला पाहिजे.
   IV. बँक कर्ज घेतलेले असावे व कर्जाच्या किमान एका हप्त्याची परतफेड झालेली असावी.

V. गटाने दुसरी श्रेणी गाठलेली असावी.

VI. यापूर्वी गटाला भांडवली अनुदान मिळालेले नसावे.

VII. बँकांनी स्वयंसहाय्यता गटांना वितरीत केलेल्या कर्जाच्या प्रमाणात गटाला भांडवली अनुदान वितरीत केले जाईल.

VIII. कर्ज व अनुदान प्रमाण सर्वसाधारणपणे 3:1 असे ठेवण्यात यावे.

IX. ज्या स्वयंसहाय्यता गटांनी आपले लेखे अद्ययावत ठेवलेले आहेत केवळ त्यांनाच भांडवली अनुदान देण्यात यावेत.

X. भांडवली अनुदानाचे वाटप Back ending पध्दतीने करण्यात यावे. (या बाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना लवकरच निर्गमित करण्यात येणार आहेत.)

3) ज्या बँक क्षेत्रात पात्र BPL गटांची संख्या मोठी असेल तेथे प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी सर्वसाधारणपणे खालील निकष वापरता येऊ शकतील,

I. कोणत्याही स्वयंसहाय्यता गटाचे वय व श्रेणी,

II. गटाची अस्थिरता

III. सर्व कार्यक्षेत्रात समानता,

IV. कर्ज: अनूदान गुणोत्तर उच्च प्रमाण, उच्च पात्रता

V. NGO व प्रेरक यांचा भक्कम पाठिंबा

सर्वसाधारणपणे बँकर्सना स्वयंसहाय्यता गटाचा दर्जा आणि सक्षमता लक्षात घेऊन निर्णय घेता येईल.

4) भांडवली अनुदान पात्र कर्जाकरीता गटांसाठी एकत्रित / सामुहिक उदयोग थाटण्याची अट राहणार नाही. तथापि प्रत्येक स्वरोजगारीचे गुंतवणूक नियोजन देणे आवश्यक राहील.

5)बँकामार्फत होणाऱ्या पतपुरवठया संदर्भात अनुदान व कर्ज अशी एकत्रित रक्कम लाभार्थ्याला दिली जाते किंवा नाही याचे संनियंत्रण ठेवण्यात यावे.

6) कर्ज परतफेड करण्यात अनियमितता व लेखे अद्ययावत न ठेवणाऱ्या गटांची पुनर्रक्षमता बांधणी करण्याकडे प्राधान्याने लक्ष ठेवावे.

7) बँकेकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांची BLBC मध्ये चर्चा करून आढावा घेण्यात यावा.

**ब) वैयक्तिक स्वरोजगारींना व भांडवली अनुदानासाठी निकष:-**

जेव्हा अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत गरीबातील गरीबांना (दुर्बल गटातील व्यक्ती, अपंग व्यक्ती व अल्पसंख्यांक व्यक्ती) गटात सहभागी करुन घेणे शक्य होणार नाही, तेव्हा अशा -

1) वैयक्तिक स्वरोजगारींना सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु. 15,000 तर अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गासाठी रु. 20,000 प्रमाणे देय राहील. (तथापि वैयक्तिक स्वरोजगारींचे प्रमाण 10% पेक्षा अधिक असता कामा नये.)

2) अनुसुचित जाती/जमाती या प्रवर्गासाठी 50 टक्के, अल्पसंख्यांकांसाठी 15 टक्के, अपंगांसाठी 3 टक्के व महिलांचे प्रमाण किमान 50 टक्के असणे आवश्यक आहे.

**व्याज अनुदान:-**

अ**) स्वयंसहाय्यता समूहांसाठी व्याज अनुदानाचे निकष:-**

1) कर्जाची नियमितपणे परतफेड करणारे तथापि भांडवली अनुदान न घेतलेले गट व्याज अनुदानासाठी पात्र ठरतील.

(पात्र गटांचे '31 मार्च 2012 पर्यंतचे अनुदान आणि 1 एप्रिल 2012 पासून आजपर्यंतचे अनुदान' अशी दोन टप्प्यात गणना करुन व्याज अनुदान देण्यात यावे. गणना करताना फक्त

**कर्ज रकमे**वरच गणना करण्यात यावी.  (यामध्ये अनुदान रकमेचा समावेश करता येणार नाही.)

2) हे अनूदान दर सहामाहीस एक वेळ या प्रमाणे DRDA मार्फत थेट गटाला देण्यात यावे.

3) बँक दर आणि 4 टक्के यामधील फरकाची रक्कम व्याज अनुदान म्हणून देण्यात येईल.

4) व्याज अनुदान रकमेपैकी बँकदर ते 7 टक्के रकमेचा भार केंद्र शासनाकडून, 7 टक्के ते 4 टक्के रकमेचा भार राज्यशासनाकडून उचलण्यात येईल. उर्वरित व्याजाची रक्कम स्वरोजगारीने बँकेला द्यावयाची आहे.

5)प्रत्येक कुटुंबामागे सर्व कर्ज टप्प्यांसाठी रु. 1 लक्ष ही कमाल मर्यादा असेल.

**क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण:-**

नॉन-इंटेंसिव्ह कार्यक्रमामध्ये क्षमता बांधणी हा **आधारभूत घटक** आहे. यासाठी या घटकावर सर्वात मोठी आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. या अभियानात अंमलबजावणी करणारी यंत्रणा आणि समुदाय या दोन्ही घटकांची क्षमता बांधणी करण्यात येणार आहे.

अ**) अधिकारी व कर्मचारी यांची क्षमता बांधणी:-**

1) जिल्हा परिषद तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे अधिकारी व कर्मचारी यांची कर्तव्ये व गरजा(TNA) ओळखून प्रशिक्षण आराखडा तयार करण्यात यावा. मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, गट विकास अधिकारी आणि विस्तार अधिकारी यांची प्रशिक्षणाद्वारे क्षमता बांधणी करण्यात यावी.

2) प्रत्येक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने आपल्याकडील कामाच्या प्राधान्यक्रमानुसार नियोजन करुन क्षमता बांधणी करण्यासाठी आराखडा तयार करावा.

3) बँकेचे  DGM, AGM, ब्रँच मॅनेजर व LDM यांच्या प्रशिक्षण गरजा ओळखून त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.

4) पंचायत राज संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसाठी उद्‌बोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे.

5) NGOs, CSOs व प्रेरक यांचेसाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे.

**ब) समुयाची क्षमता बांधणी:-**

समुदायाची क्षमता बांधणी करताना खालील घटकांना प्राधान्य देण्यात यावे.

1) पंचसूत्री

2) उपजीविकेच्या स्त्रोतांचे बळकटीकरण

3) बँका व पतविषयक जाणीव-जागृती,

4) लिंग भेद दूर करणे व कायदेविषयक बाबी,

5) कौशल्य वृध्दी

क्षमता बांधणीसाठी आर-सेटीचीही मदत घेण्यात यावी. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यामागे रु.7,500 प्रमाणे खर्च करता येईल.

**क्षमता बांधणी कार्यक्रमासाठी खालील बाबी कराव्यात-**

1) समुदाय संसाधन व्यक्ती (CRPs), लेखापाल (BKs) बनण्याची क्षमता लक्षात घेऊन गटांमधून योग्य व्यक्तींची निवड करण्यात यावी.

2) समुदाय संसाधन व्यक्ती (CRP)-

   - किमान इयत्ता सातवी उत्तीर्ण असावी.
   - तिचा गट किमान 2 वर्षे अनुभवी असावा.
   - गटाच्या किमान 20 सभांमध्ये सहभागी असावी.
   - वैयक्तिक बचत किमान रु 1 हजार असावी तसेच,
   - उत्तम सुसंवादी व स्वेच्छेने इतरांना शिकविणारी असावी.

3) लेखापाल (BK) -

- किमान इयत्ता दहावी उत्तीर्ण असावी. व लेखे ठेवण्यास सक्षम असावी.
- तिचा गट किमान 1 वर्ष अनुभवी असावा.
- गटाच्या किमान 10 सभांमध्ये सहभागी असावी.
- वैयक्तिक बचत किमान रु 500 असावी तसेच,
- उत्तम सुसंवादी व स्वेच्छेने इतरांना शिकविणारी असावी.

4) जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि NGOs यामधून किमान 2 साधन व्यक्तींची निवड करावी. जे नंतर संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करु शकतील.

5) जिल्हयातील निवासी / अनिवासी प्रशिक्षण व निवासयोग्य (जिल्हा व तालुकास्तरीय) निवडक स्थळांची निवड करुन ठेवावी.

**क्लस्टर स्तरावर सुक्ष्म उदयोग निर्मिती:-**

**1)** सुक्ष्म उदयोग निर्मितीसाठी Activity Clusters निवडून त्यांना योग्य त-हेने Forward Backward Linkages करण्यात यावे. अशा सुक्ष्म उदयोगांकडे 'एक प्रकल्प' या दृष्टीकोनातून पाहावे.

**2)** Activity Clusters प्रारंभी तालुक्यातील एक किंवा दोन क्लस्टर निवडून त्यामधील किमान दोनशे स्वरोजगारींना निवडण्यात यावे. सुक्ष्म उद्योगासाठी गटाला केंद्रस्थानी ठेवून नियोजन करावे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत वैयक्तिक स्वरोजगारींचा समावेश करण्यात यावा.

**3)** Activity Clusters निहाय प्रत्येक प्रकल्पाचा 'प्रकल्प अहवाल' तयार करण्यात यावा. प्रकल्प अहवाल तयार करताना त्यामध्ये सारांशाने प्रास्ताविक, लक्ष्य गट SWOT विश्लेषण, उद्दिष्ट गट (ज्यामध्ये वैयक्तिक स्वरोजगारींचे प्रमाण 10 टक्क्यांपेक्षा अधिक

असणार नाही ), गट- केंद्रीत कार्यपध्दती, Forward Backward Linkages, आर्थिक स्थिती, प्रशिक्षण व क्षमता बांधणी, पायाभूत सुविधा व विपणन आणि गरजेप्रमाणे पुरविलेली मदत या बाबींचा समावेश असावा.

**4)** सदर क्लस्टर्स मधील विद्यमान सुक्ष्म उदयोगांचे बळकटीकरण करण्यावर भर देण्यात यावा.

**5)** पारदर्शकता आणि निधीचा विनियोग या संदर्भात अनुदान वितरण प्रकरणांची फेरपडताळणी (Asset Verification) करुन अनुदानाचा चुकीच्या पध्दतीने गैरवापर केल्याचे दिसून आल्यास जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

**पायाभूत सुविधा आणि विपणन:-**

1) प्रारंभी निवडलेल्या क्लस्टर्स मधील गरीबांच्या सुक्ष्म उद्योगांसाठी विशेष गरज असल्याशिवाय कोणतीही नवीन पायाभूत सुविधा उभारु नये.

2) अपूर्णावस्थेतील कामे प्राधान्याने पुर्ण करुन घ्यावीत. व कोणतेही दायित्व नव्याने निर्माण करु नये.

3) नवीन उपक्रम हा निवडलेल्या क्लस्टर्स मधील प्रकल्पाचाच पूरक भाग असावा.

4) स्वयंसहाय्यता संस्थांच्या प्रकल्पांना आवश्यक सेवा पुरवाव्यात, उत्पादनांना उत्तम बाजारपेठ उपलब्ध करुन दयावी. त्यासाठी त्यांच्या मागणीप्रमाणे सेवा व विपणन व्यवस्था पुरविण्यात यावी.

5) पायाभूत सुविधा आणि विपणन या संबंधातील प्रकल्प तांत्रिक सहाय्य व मान्यतेसाठी एमएसआरएलएम कार्यालयाकडे सादर करावेत.

**कौशल्य  आणि रोजगार निर्मिती:-**

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबासाठी ‘एक कुटुंब-एक नोकरी’ निर्माण करणारी कौशल्ये तरुणांमध्ये विकसित करुन त्यांचे संपूर्ण कुटुंब दारिद्रय रेषेबाहेर आणण्यासाठी हातभार लागु शकेल या उद्देशाने या योजनेत या घटकावर भर देण्यात आलेला आहे. त्यासाठी बेरोजगार युवक व युवकांमधील कौशल्ये यांचा शोध घेण्यात यावा. राज्यातील अपवादात्मक एक-दोन जिल्हे वगळता SGSY मध्ये हा घटक दुर्लक्षित होता.

1) जिल्हयातील **इंडस्ट्री असोशिएशन्** आणि **चेंबर ऑफ कॉमर्स** यांच्याशी विचारविनिमय करुन रोजगार निर्मितीच्या संधींचा शोध घेण्यात घ्यावा व त्यानुसार रोजगार निर्मितीचे जिल्हयात लघुप्रकल्प तयार करावेत.

2) एका प्रकल्पात किमान 50 स्थानिक इच्छुक व लायक दारीद्रय रेषेखालील युवकांना भरती करुन त्यांना पुर्वतयारीचे प्रशिक्षण दयावे.
3) ज्यांच्याकडे किमान पायाभुत प्रशिक्षण सुविधा आहेत, असे प्रशिक्षक आणि प्रशिक्षकांच्या संस्था (जसे आयटीआय, अभियांत्रिकी महाविदयालये, नर्सिंग महाविदयालये, केव्हीके, शेतकी महाविदयालये व पॉलिटेक्नीक महाविदयालये ) आणि NGOs यांची निवड करावी.
4) गरजेनुसार प्रशिक्षणासाठी आर-सेटीचा उपयोग करण्यात यावा.

**संनियंत्रण व मुल्यमापन**

अभियानाच्या उपयुक्ततेसाठी व यशस्वीतेसाठी सातत्यपुर्वक संनियंत्रण आणि मुल्यमापन अत्यावश्यक् आहे. याद्वारे मिळालेल्या अनुभवांच्या आधारे सकारात्मक बदल घडवुन आणता येतील, ज्यामुळे अभियानाची फलश्रुती वाढण्यास मदत होईल. त्यासाठी-

- स्वयंसहाय्यता गटांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या **अकांऊटींग सॉफ्टवेअर** मध्ये अदययावत माहिती दैनंदिन भरण्यात यावी. यामध्ये कॅश बूक, कर्ज खतावणी, अनुदान नोंदवही यासारखे लेखे उपलब्ध करुन देण्यात येतील. स्वयंसहाय्यता गटांसाठी निधीचे वितरण थेट गटाच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात यावे. तसेच वैयक्तिक स्वरोजगारींच्या बाबतीतही हेच धोरण ठेवण्यात यावे.

(सदर मार्गदर्शक सूचना या प्रारंभिक स्वरुपाच्या असून गरजेनुसार त्यामध्ये भर / बदल करण्यात येईल. तसेच मुल्यमापन, प्रशासकीय खर्च, अनुदान वाटप पध्दती याबाबत सविस्तर सूचना वेगळयाने निर्गमित करण्यात येतील. या कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या सर्व समित्या पुर्वीप्रमाणेच कार्यरत राहतील, आणि त्यांना पुर्वी नेमून दिल्याप्रमाणे काम करतील. तथापि त्यांची कार्यकक्षा स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेऐवजी राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान ही असेल. )

टीप- दिनांक 24 सप्टेंबर 2012 रोजी यशदा, पुणे येथे होणाऱ्या कार्यशाळेस येताना उपरोक्त प्रारुप मार्गदर्शक सुचनांबाबत आपले अभिप्राय / प्रतिक्रिया / सुचना लेखी स्वरुपात सादर केल्यास योग्यतेनुसार उचित बदल करणे सुलभ् होईल.

श्रावण हर्डीकर, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान